
डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस ठाणे शहर

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ७८५ /२०२६ दिनांक:– ०९/०९/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, डोंबिवली वाहतुक उप विभागाच्या हदद्दीत **दिनांक १४/०९/२०२६ ते दिनांक २५/०९/२०२६** रोजी पावेतो **गणेशोत्सव** सणानिमित्ताने कल्याण डोंबिवली महानगर पालिकेच्या हद्दीत मोठागाव ब्रिजचे खाली, रेतीबंदर खाडी येथे गणपती विसर्जन होत असते. सदर ठिकाणी **दि.१५/०९/२०२६ रोजी (दीड दिवसाचे), दि.१८/०९/२०२६ रोजी (पाच दिवसाचे), दि. १९/०९/२०२६ (गौरी गणपती विसर्जन), दि.२०/०९/२०२६ (सात दिवसाचे) व दि.२५/०९/२०२६ रोजी (अनंत चतुर्दशी) असे गणपती विसर्जन होणार आहेत.** त्यामुळे सदर ठिकाणी गणपती विसर्जन करण्याकरीता सदर ठिकाणी मोठया संख्येने भाविक सहभागी होत असतात. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद – **१)** ठाणे, मुंबई येथुन मानकोली – मोठागाव ब्रिज वरून मोठागाव डोंबिवली पश्चिम येथे येणारी वाहतुक नारपोली वाहतूक उप विभाग हद्दीत **१) मानकोली भिंवडी हायवे, २) अंजुर दिवेगाव, ३) लोढा धाम** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने नारपोली वाहतूक उप विभाग यांचे हद्दीत अंजुर फाटा, राजनोली भिंवडी बायपास मार्गे, छत्रपती शिवाजी महाराज चौक (दुर्गाडी, कल्याण) येथुन इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – **२)** कल्याण, अंबरनाथ, बदलापुर व नवीमुंबई येथुन मोठागाव ब्रिजमार्गे मानकोली भिंवडी कडे जाणाऱ्या वाहनांना कोळसेवाडी वाहतूक उप विभाग हद्दीत **१) पत्रीपुल, २) टाटा नाका, ३) सुयोग हॉटेल, ४) डी एन एस बॅकेजवळ, सोनारपाडा ५) मानपाडा पेट्रोलपंपाजवळ, मानपाडा चौक, ६) छत्रपती शिवाजी महाराज सर्कल, डोंबिवली पुर्व** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने कल्याण वाहतूक उप विभागाचे हद्दीतुन छत्रपती शिवाजी महाराज चौक (दुर्गाडी, कल्याण) मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – **३)** ठाकुर्ली पुर्व व डोंबिवली पुर्व कडुन मोठागाव ब्रिजमार्गे मानकोली भिंवडी कडे जाणाऱ्या वाहनांना **कोपर ब्रिज** व **ठाकुर्ली ब्रिज** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने डोंबिवली पुर्व येथुन कल्याण वाहतूक उप विभागाचे हद्दीतुन छत्रपती शिवाजी महाराज चौक (दुर्गाडी, कल्याण) मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – **४)** डोंबिवली पश्चिमेकडुन मोठागाव ब्रिजमार्गे मानकोली भिंवडी कडे जाणाऱ्या वाहनांना **मोठागाव ब्रिज** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने डोंबिवली पुर्व येथुन कल्याण रोड अथवा ९० फिट रोड मोर्गे कल्याण वाहतूक उप विभागाचे हद्दीतुन छत्रपती शिवाजी महाराज चौक (दुर्गाडी, कल्याण) मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना तरी दि.१५/०९/२०२६ रोजी (दीड दिवसाचे), दि.१८/०९/२०२६ रोजी (पाच दिवसाचे), दि.१९/०९/२०२६ (गौरी गणपती विसर्जन), दि.२०/०९/२०२६ (सात दिवसाचे) व दि.२५/०९/२०२६ रोजी (अनंत चतुर्दशी) रोजी दुपारी १२:०० वा. पासुन ते गणपती विसर्जन संपेपर्यत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

प्रत कार्यवाहीस्तव,

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालीका, कल्याण

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, कल्याण

नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत कार्यवाहीस्तव सविनय सादर,

मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि डोंबिवली, कोळशेवाडी, कल्याण वाहतूक उपविभाग.